शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०५/२०२४

श्री.जाधव कृष्णत उत्तम
मु.पो.सैदापूर, ता.कराड, जि.सातारा } तक्रार अर्जदार

विरूध्द

१. जी.के.गुजर मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्ट, कराड, के.एन.गुजर मेमोरिअल हॉस्पिटल, शनिवार पेठ, एस.टी.स्टॅण्ड जवळ, कराड, जि. सातारा.

२. डॉ.अशोक गुजर टेक्नि.इन्सि. डॉ.दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड, जि.सातारा. } वि.प.

जी.के.गुजर मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्ट, कराड, जि. सातारा यांचे डॉ.अशोक गुजर टेक्नि. इन्सि. डॉ.दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड, जि.सातारा यांचेकडील सहा. प्राध्यापक श्री.जाधव कृष्णत उत्तम यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.१६/०७/२०२४ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे.

**तक्रारीचे स्वरूप :**

महोदय, मी वरील नमूद महाविद्यालयात दि.०२/०१/२०१४ पासून आजपर्यंत सलगपणे बेसिक सायन्स ॲण्ड ह्युमॅनिटी डिपार्टमेंटमध्ये सहा. प्राध्यापक या पदावर कार्यरत आहे व माझी निवड विद्यापीठ निवड समितीमार्फत झाली आहे. १.महाविद्यालयात मी रूजू झाल्यापासून नियमाप्रमाणे असणारे मेडिकल लिव्ह आतापर्यंत देण्यात आलेली नाहीत. तरी सदरचा सर्व मेडिकल लिव्ह माझ्या खात्यात जमा करण्याचे आदेश व्हावेत. २. सदरील सर्व मेडिकल लिव्ह माझ्या खात्यात जमा करून त्याची प्रत मला व अहवाल आपणास सादर करण्याचे आदेश व्हावेत ही विनंती.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

तक्रारी ही प्रामुख्याने मेडीकल लिव्ह संदर्भात आहे.

**संस्थेचा अभिप्राय :**

मेडीकल लिव्ह त्यांनी ज्यावेळा मागीतल्या आहेत त्या वेळी देण्यात आलेल्या आहेत. आजअखेर त्यांच्या शिल्लक असणा-या ५८ मेडिकल लिव्ह त्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आल्या आहेत.

**समितीची निरिक्षणे :**

प्रस्तुतच्या तक्रारीत तक्रारदाराने त्यांच्या एकूण सेवा कालावधीच्या प्रमाणात कायद्यानुसार उपलब्ध असणाऱ्या मेडीकल लिव्ह अभिलेखात नमूद केलेले नाही. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या सेवा पुस्तकामध्ये एकूण ८८ पैकी ५८ दिवस मेडीकल रजा नमूद करण्यात आलेल्या आहेत ते तक्रारदारास मान्य नाही. त्यामुळे सदरच्या अभिलेखामध्ये त्यांच्या एकूण मेडीकल लिव्ह ८८ असल्याचे नमूद करण्याचा आदेश करावा अशी समितीसमोर विनंती केली आहे. तथापि तक्रारदार यांनी त्यांचे लेखी युक्तिवादामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांनी महाविद्यालयास ताळेबंदाच्या दिलेल्या कागदावरच महाविद्यालयाने अभिप्राय दिला आहे व त्या अभिप्रायामध्ये २०१५ मध्ये मेडीकल ० असे दिले आहे. ते तक्रारदारास मान्य नाही. त्याकरिता तक्रारदार महाराष्ट्र राज्य नागरी सेवा नियम १९८१ मधील नियम क्र. ५४ १(२)(।) याचा आधार घेतात व या तरतुदीनुसार एक वर्षानंतर सर्व रजा देणे बंधनकारक आहे. त्यामुळे सन २०१५ पासून त्यांना मेडीकल लिव्ह देणे आवश्यक व कायदेशीर आहे. तसेच २०२० व २०२१ मधील मेडीकल ० केल्या आहेत. त्यासंबंधीत कोणताही शासकीय आदेश व विद्यापीठ परिपत्रक जोडलेले नाही आणि म्हणून त्या वर्षामधील प्रत्येकी १०-१० मेडीकल लिव्ह देणे नमूद केले आहे. त्यामुळे ताळेबंदामधील नमूद ५८ मेडीकल रजा या तक्रारदारास मान्य नाहीत. समितीसमोर संस्था प्रतिनिधी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.एम. मुल्ला हे समितीसमोर हजर होते. तक्रारदाराने सादर केलेल्या ताळेबंदावर महाविद्यालयाने दिलेल्या शेऱ्याबाबत प्राचार्य यांनी असे कथन केले की, २०१५ मध्ये मेडीकल लिव्ह तक्रारदार यांना लागू होत नाहीत तसेच २०२० व २०२१ मध्ये कोव्हीड असले कारणाने त्या सालातील मेडीकल लिव्ह देण्यात आलेल्या नाहीत.

सुनावणी दरम्यान उभयपक्षांनी समितीपुढे हजर राहून आपले म्हणणे मांडले तथापि समितीसमोर झालेल्या चर्चेनुसार तक्रारदार कायमसेवेत असताना सन २०१५ च्या मेडीकल लिव्ह तक्रारदार यांना देय होत असल्याचे तसेच कोव्हीड कालावधीमधील मेडीकल लिव्ह लागू असल्याने तक्रारदार यांना देय होत असल्याचे प्राचार्य यांनी मान्य केले. तसे त्यांनी समितीसमोर लेखी पत्र सादर केले. प्राचार्य यांनी दिलेले

पत्र या अभिलेखावरती समाविष्ट करून घेण्यात आलेले आहे. त्यावर तक्रारदार यांनी हे मला मान्य आहे असे लिहून दिले. प्राचार्य यांनी तक्रारदार यांना देय असलेल्या ८८ मेडीकल लिव्हची सेवापुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल असे आश्वासन या समितीसमोर दिले.

सबब समितीने दोन्ही पक्षांना तक्रारदाराने केलेली तक्रार सामोपचाराने मिटली असून काही आदेश पारित करण्यासारखे कारण राहिलेले नाही. सबब प्रस्तुतची तक्रार निकाली काढणेत येत आहे.

**आदेश**

प्रस्तुतच्या तक्रारीतील वाद मिटला असल्याने तक्रार निकाली काढणेत येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

दिनांक : 04 SEP 2024

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)